सहायक कक्ष अधिकारी (मर्यादित) विभागीय परीक्षा-2016
परीक्षेच्या दि. 27 नोव्हेंबर, 2016

# A

2016 पेपर क्र.:-2. CODE : PO8

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

प्रश्नपुस्तिका

## पेपर II

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

वेळ : 1 (एक) तास | एकूण प्रश्न : 100 | एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "ब" सोडविणे आवश्यक आहे. आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - अ

1. अनुच्छेद 19(1) नुसार सर्व नागरिकांस यापैकी कोणता मूलभूत हक्क नाही ?

(1) अधिसंघ व संघ बनविणे
(2) कोणताही पेशा आचरणे
(3) परदेशाचे नागरिकत्व घेणे
(4) भाषण देणे

---

2. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा.

(1) 3 रा भाग – मूलभूत हक्क
(2) 4 था भाग – राज्यधोरणाची निदेशक तत्वे
(3) 5 वा भाग – मूलभूत कर्तव्ये
(4) वरीलपैकी नाही

---

3. खालीलपैकी कोणती राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे नाहीत ?

(अ) एकरूप नागरीसंहिता
(ब) संविधानाचे पालन करणे
(क) आरोपीला स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती न करणे
(ड) न्याययंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब)
(2) (ब) व (क)
(3) (क) व (ड)
(4) (ब), (क) व (ड)

---

4. धर्म किंवा कोणत्या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल ?

(1) लिपी
(2) भाषा व लिपी
(3) भाषा
(4) संस्कृती

---

5. खालीलपैकी योग्य जोडी ओळखा.

(1) सांस्कृतीक व शैक्षणीक हक्क – अनुच्छेद क्र. 29 व 30
(2) धर्म स्वातंत्र्याचा हक्क – अनुच्छेद 23 व 24
(3) शोषणाविरुद्ध हक्क – 25 ते 28
(4) स्वातंत्र्यांचा हक्क – 14 ते 18

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

6. राज्यघटनेनुसार 'कायदा' च्या व्याख्येमध्ये खालीलपैकी कशाचा समावेश होतो ?

(अ) अध्यादेश (ब) अधिसूचना (क) रूढी किंवा परिपाठ

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (अ) व (ब) (2) केवळ (ब)

(3) सर्व (4) एकही नाही

---

7. सहा ते चौदा वर्षे वयाच्या बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतुद कोणत्या घटनादुरुस्ती अन्वये करण्यात आली ?

(1) 42 वी घटनादुरुस्ती (2) 45 वी घटनादुरुस्ती (3) 85 वी घटनादुरुस्ती (4) 86 वी घटनादुरुस्ती

---

8. मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले कायदे शून्यवत करण्याची तरतुद संविधानाच्या कोणत्या कलमात आहे ?

(1) 13 व्या (2) 32 व्या (3) 31 व्या (4) यापैकी नाही

---

9. समानतेच्या हक्कानुसार :

(अ) अस्पृश्यता नष्ट करण्यात आली.

(ब) सेवाविषयक किंवा विद्याविषयक किताब शासनाकडून प्रदान केला जाऊ शकतो.

(क) सर्व नागरिकांना कायद्याचे समान संरक्षण देण्यात आले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व विधाने बरोबर आहेत (2) विधान (ब) चूकीचे आहे

(3) सर्व विधाने चूकीची आहेत (4) केवळ विधान (अ) बरोबर आहे

---

10. राष्ट्रीय महत्त्वाची स्मारके व स्थाने यांचे संरक्षण करणे हे :

(1) प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य आहे. (2) राज्य धोरणाचे निदेशक तत्त्वे आहे.

(3) संविधानिक उपाय योजनांचा हक्क आहे. (4) यापैकी काहीही नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

11. खालीलपैकी कोणते कर्तव्य मूलभूत कर्तव्य आहे?

(1) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण
(2) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे
(3) स्त्रियांची प्रतिष्ठा जपणे
(4) वरीलपैकी सर्व

---

12. सहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांची प्रारंभीक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण या करिता घटनेमध्ये :

(1) तरतुद करण्यात आलेली नाही.
(2) राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वेमध्ये तरतुद करण्यात आली आहे.
(3) 'मूलभूत हक्क' मध्ये तरतुद करण्यात आली आहे.
(4) 'मूलभूत कर्तव्ये' मध्ये तरतुद करण्यात आली आहे.

---

13. राज्य हे विशेषत: पुढील गोष्टी साध्य करण्याच्या दिशेने आपले धोरण आखेल :

(अ) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री व पुरुष नागरिकांना सारखाच असावा.
(ब) पुरुष व स्त्री या दोघांनाही समान कामाबद्दल समान वेतन मिळावे.
(क) स्त्री व पुरुषांना काम देताना आरोग्य व ताकद विचारात न घेता काम द्यावे.
(ड) यापैकी काहीही नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क)
(2) (अ) व (ब)
(3) (ब) व (क)
(4) (ड)

---

14. एकरूप नागरी संहिता लाभण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील अशी तरतुद संविधानाच्या कोणत्या कलमात केली आहे?

(1) कलम 40
(2) कलम 42
(3) कलम 44
(4) कलम 46

---

15. परदेशी नागरिकांना खालीलपैकी कोणते मूलभूत हक्क प्राप्त नाहीत?

(अ) कायद्यासमोर समानता
(ब) सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क
(क) संचार स्वातंत्र्य
(ड) व्यक्तिगत स्वातंत्र्य

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ड)
(2) (ब) व (क)
(3) (अ), (क) व (ड)
(4) (अ), (ब) व (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

16. मूलभूत कर्तव्यांचा समावेश संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये करण्यात आला आहे ?

(1) अनुच्छेद 16 (2) अनुच्छेद 61 (क) (3) अनुच्छेद 51 (4) अनुच्छेद 51 (क)

17. खालीलपैकी अचूक जोडी ओळखा.

(1) अस्पृश्यता नष्ट करणे – मूलभूत कर्तव्य

(2) कायदेविषयक मोफत सहाय्य – राज्यधोरणाची निदेशक तत्वे

(3) हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग – मूलभूत हक्क

(4) माहिती अधिकार – मूलभूत हक्क

18. खालीलपैकी मूलभूत कर्तव्ये कोणते ?

(1) बालकाचे वय सहा वर्षे होईपर्यंत त्याच्या संगोपनाची व शिक्षणाची तरतूद राज्य करेल.

(2) जन्मदाता किंवा पालक यांनी आपल्या पाल्यास 6 ते 14 या वर्षादरम्यान शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.

(3) सहा ते चौदा वर्षापर्यंतच्या मुलांना कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देणे.

(4) शासकिय शैक्षणिक संस्थेतून धार्मिक शिक्षण न देणे.

19. गुन्हा सिद्ध झालेल्या व्यक्तीस कमाल शिक्षा किती देता येईल ?

(1) न्यायाधिश/प्राधिकारी यांच्या मर्जीनुसार

(2) निर्णय देण्याच्या वेळेस अंमलात असलेली कमाल शिक्षा

(3) गुन्हा/अपराध करण्याच्यावेळेस अंमलात असलेली कमाल शिक्षा किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा

(4) सरकारी वकील ठरवितील त्यानुसार

20. ग्रामपंचायतीच्या संघटनासंदर्भात तरतुदी संविधानाच्या कोणत्या भागात आहेत ?

(1) भाग 2 (2) भाग 3 (3) भाग 4 (4) भाग 5

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

21. कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे मूलभूत हक्कांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या ?

(1) 73 व्या (2) 15 व्या (3) 44 व्या (4) 40 व्या

---

22. खालीलपैकी कोणती बाब मूलभूत कर्तव्यामध्ये समाविष्ट नाही ?

(1) हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे (2) संस्कृतीचा वारसा जतन करणे

(3) भारताची सार्वभौमता जपणे (4) मतदान करणे

---

23. मूलभूत हक्कांपैकी समानतेचा हक्क याचा समावेश घटनेतील कोणत्या अनुच्छेदामध्ये करण्यात आला आहे ?

(1) 12 ते 16 (2) 14 ते 18 (3) 18 ते 30 (4) 12 ते 30

---

24. राज्यघटनेमध्ये मूलभूत कर्तव्यांचा समावेश कितव्या घटनादुरुस्ती द्वारे करण्यात आला ?

(1) चाळीसावी (2) बेचाळीसावी (3) त्रेचाळीसावी (4) चव्वेचाळीसावी

---

25. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या कारणावरून कोणत्याही नागरिकास दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, करमणुकीची साधने यात प्रवेश करण्यास मनाई करता येणार नाही ही तरतुद कोणत्या कलमात आहे ?

(अ) कलम 15 (ब) कलम 14 (क) कलम 16 (ड) कलम 18

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) (2) (ब) व (अ)

(3) (क) व (ड) (4) यापैकी नाही

---

26. श्री. रामपाल, शिपाई यांचे कर्जबाजारीपणामुळे दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून वेतन काढले जात नाही. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 नुसार श्री. रामपाल हे कोणत्या कारवाईस पात्र ठरतील ?

(1) निलंबनास पात्र ठरतील

(2) बडतर्फ करण्यास पात्र ठरतील

(3) शासन त्यांच्याविरुद्ध काहीही करू शकत नाही

(4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

27. कार्यासन अधिकाऱ्यांनी केलेल्या खालील कृतींपैकी म.ना.से. (वर्तणुक) नियमानुसार अयोग्य असलेली कृती कोणती ?

(अ) त्याने सेवानिवृत्त होणाऱ्या उपसचिवास भेटवस्तू देण्यासाठी लिपीक व सहायकांकडून वर्गणी जमा केली.

(ब) शासन मान्यतेशिवाय सोसायटीच्या सार्वजनिक गणेशोत्सवात भाग घेतला.

(क) शासन मान्यतेशिवाय ध्वजदिन निधी साठीच्या कार्यक्रमात भाग घेतला.

(ड) आश्रमशाळेतील गरीब विद्यार्थ्यांना देण्यासाठी हाताखालील कर्मचाऱ्यांकडून वह्या जमा केल्या.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (ब) व (क) (2) फक्त (ड)

(3) (अ) व (ड) (4) सर्वच

---

28. स्थावर, जंगम व मौल्यवान मालमत्तेचे विवरणपत्र सादर करण्याच्या नियम 19 पोटनियम 4 खेरीज अन्य तरतूदीतून गट 'क' व गट 'ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांना वगळण्यासाठी कोणाची सहमती आवश्यक आहे ?

(1) संबंधित विभागाचे मंत्री (2) वित्त विभाग

(3) विधि व न्याय विभाग (4) सामान्य प्रशासन विभाग

---

29. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 भारतीय संविधानाच्या अनुच्छेद __________ च्या परंतुकातील अधिकारान्वये __________ रोजी अंमलात आले. (रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा)

(1) 209, 12 जुलै 1979 (2) 309, 12 जुलै 1979

(3) 209, 11 जुलै 1979 (4) 309, 11 जुलै 1979

---

30. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही सार्वजनिक संस्थेकरीता किंवा कोणत्याही खाजगी व्यक्तीकरीता त्याने केलेल्या कामासाठी __________ मंजूरी घेतल्याखेरीज फी स्वीकारता येणार नाही.

(1) आपल्या वरिष्ठांची (2) विभाग प्रमुखांची

(3) विहित प्राधिकरणाची (4) वरीलपेक्षा वेगळे उत्तर आहे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

31. शासकीय कर्मचारी कर्तव्य पार पाडत असताना म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 नुसार माहिती अधिकाराच्या कोणत्या अधिनियमान्वये संबंधित अर्जदारास माहिती देऊ शकतो ?

(1) 2005 चा 22 (2) 2004 चा 22 (3) 2005 चा 52 (4) 2005 चा 25

---

32. शासकीय व्यवहार असलेल्या कंपनीत कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या सावत्र मुलीने नोकरी स्विकारली असल्यास त्याने काय करणे योग्य राहील ?

(1) प्रथम नोकरी सोडायला लावून शासनाच्या परवानगीनंतरच नोकरी स्विकारायला लावणे.

(2) शासनाच्या परवानगीची गरज नसल्याचे समजून काहीही न करणे.

(3) नोकरी स्विकारल्याबाबत व कर्मचाऱ्याच्या कंपनीशी असलेल्या व्यवहाराबाबत शासनास कळविणे.

(4) यापूर्वी शासनास कळविले असले तरी पुन्हा एकदा कळविणे.

---

33. वर्ग तीन व वर्ग चार चा कर्मचारी नसलेल्या कर्मचाऱ्याच्या निरोप समारंभाकरीता खालील नमूद शासकीय कर्मचाऱ्याकडून वर्गणी गोळा करता येणार नाही.

(1) वर्ग तीन चे कर्मचारी (2) वर्ग एक चे अधिकारी

(3) वर्ग चार चे कर्मचारी (4) वरील (1) व (3) येथील नमुद कर्मचारी

---

34. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास दूरदर्शनवरील कार्यक्रम किंवा अन्य प्रसार माध्यमाद्वारे स्वत:ची गाऱ्हाणे मांडण्यास वर्तणूक नियमातील कोणत्या तरतुदीद्वारे प्रतिबंध करण्यात आला आहे ?

(1) नियम 3 (2) नियम 4 (3) नियम 9 (3) चा क (4) नियम 9 (3) चा ड

---

35. औद्योगिकेतर संघटनेच्या थकबाकीदार नसलेल्या सदस्यास संघटनेचे लाभ मिळण्याचा हक्क कधी प्राप्त होतात ?

(1) संघटनेचे सदस्यत्व स्विकारल्यापासून (2) सदस्य झाल्यापासून 1 महिन्यानंतर

(3) सदस्य झाल्यापासून 3 महिन्यानंतर (4) सदस्य झाल्यापासून 6 महिन्यानंतर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

36. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 नुसार कुटुंबाच्या व्याख्येत खालीलपैकी कोणाचा समावेश होतो ?

(1) विभक्त झालेली पत्नी/पती

(2) स्वतंत्र व्यवसाय करणारा भाऊ

(3) सावत्र मुलगा जो कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे

(4) कायद्यानुसार अभिरक्षा काढून घेण्यात आलेली मुलगी

---

37. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात पुढील विधाने कृपया पहावीत.

(अ) श्रीम. लता यांनी केलेल्या कविता 'आपलं मंत्रालय' या मासिकासाठी पाठविल्या.

(ब) श्री. संतोष यांनी स्पर्धा परिक्षांविषयीचा मार्गदर्शनपर लेख 'स्टडी सर्कल' च्या मासिकासाठी पाठविला.

(क) श्री. किरण यांनी निसर्गाच्या विविध रूपांचे काढलेले फोटो प्रसिद्धिसाठी महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रासाठी दिले.

(ड) श्री. प्रसाद यांनी एफ.एम. रेडिओवरील मुलाखतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या कार्यक्रमाची माहिती दिली.

म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 अन्वये वरीलपैकी कोणाची कृती नियमाविरुद्ध आहे ?

(1) (अ) व (क) (2) (ब) व (ड)

(3) (अ), (ब), (क) व (ड) (4) यापैकी नाही

---

38. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 च्या तरतुदीचे कोणत्या प्रकरणी उल्लंघन झाल्याचे समजण्यात येईल ?

(1) कर्तव्यावर असताना मादक द्रव्याचे सेवन करणे.

(2) सार्वजनिक ठिकाणी मादक द्रव्ये व मादक औषधी पदार्थांचे सेवन करणे.

(3) नशा चढलेल्या अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी येणे.

(4) वरील सर्व

---

39. खालील नमूद अधिकारी/कर्मचाऱ्यांपैकी कोणत्या अधिकारी/कर्मचाऱ्याला भत्ता व दायित्व विवरणपत्र देण्याची तरतुद लागू होणार नाही ?

(1) उप मुख्य कार्यकारी अधिकारी वर्ग - 1 (2) वित्त व लेखा अधिकारी वर्ग - 2

(3) शिपाई (4) लिपिक व टंकलेखक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

40. संघटनेच्या कामकाजात अनियमितता करणाऱ्या अथवा संघटनेच्या हिताला बाधक ठरेल अशी कृती करणाऱ्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला किंवा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये ________ सदस्यांच्या मताधिक्याने काढता येईल.

(1) 1/3 (2) 1/4 (3) 2/3 (4) 3/4

---

41. प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याच्या शासकीय सेवेत शासन विनिर्दिष्ट करेल अशा कालांतराने विहीत नमुन्यातील मत्ता व दायित्व विवरणपत्रात खालील बाबींचा तपशील सादर करील :

(अ) त्याला वारस म्हणून प्राप्त झालेली, त्याच्या मालकीची किंवा त्याने संपादित केलेली स्थावर व जंगम मालमत्ता.

(ब) त्याने रोखे, शेअर्स किंवा इतर गुंतवणूकीमध्ये गुंतविलेले पैसे, त्यांची खरेदी व विक्रीमधून मिळालेली रक्कम.

(क) त्याने प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या घेतलेली कर्जे व इतर दायित्वे.

(ड) त्याला वारसा म्हणून प्राप्त झालेली, त्याच्या मालकीची अथवा त्याने संपादित केलेली रोख रक्कम, ऋणपत्रे व बँक ठेवीसहित शेअर्स.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) (2) (अ), (ब) व (ड)

(3) (ब), (क) व (ड) (4) (अ), (ब), (क) व (ड)

---

42. राजकारण व निवडणूकाबाबतीत खालील बाबीपैकी शासकीय कर्मचाऱ्यास कोणती बाब योग्य आहे ?

(अ) राजकीय चळवळीत भाग घेणार नाही.

(ब) राजकारणात भाग घेणाऱ्या संघटनेचा सभासद होणार नाही.

(क) ज्या चळवळीमुळे शासनाला घातक ठरत असतील अशा चळवळीत भाग घेणार नाही, वर्गणी देणार नाही किंवा अन्य सहाय्य करणार नाही.

(ड) विधानसभेच्या किंवा इतर निवडणूकात मतदान करणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी (अ) व (ब) (2) वरीलपैकी (अ), (ब) व (क)

(3) वरीलपैकी (अ) व (क) (4) केवळ (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

43. श्री. राणे, कक्ष अधिकारी यांनी त्यांच्या स्वग्रामी नव्याने उभारलेल्या सार्वजनिक ग्रंथालयाला त्यांचे नाव देण्यासाठी ग्रामपंचायतीच्या बैठकीत सहमती दर्शविली. श्री. राणे यांच्या कृतीसंदर्भात खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) श्री. राणे यासाठी सक्षम आहेत.

(2) श्री. राणे यांनी यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

(3) श्री. राणे यांची कृती अयोग्य आहे.

(4) श्री. राणे यांनी याबाबत शासनास कळवून कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक आहे.

---

44. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 नुसार कार्यासन अधिकाऱ्याची पुढीलपैकी कोणती कृती योग्य आहे?

(अ) दुसऱ्या विभागाच्या सचिवांनी एखादी नस्ती थेट मागविल्यास ती तात्काळ उपलब्ध करून देणे.

(ब) विभागाच्या मंत्रीमहोदयांच्या निर्देशानंतर नस्ती दुसऱ्या विभागाच्या सचिवास उपलब्ध करून देणे.

(क) माहीती अधिकार नियम – 8 खाली असणारी नस्ती माहीती अधिकारात दुसऱ्या विभागाच्या सचिवांना देणे.

(ड) शासन आदेशान्वये प्राधीकृत केल्यास नस्ती दुसऱ्या विभागाच्या सचिवांना देणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) (2) (ब) व (ड)

(3) (क) व (ड) (4) (अ) व (ड)

---

45. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 अनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेबाबत खालीलपैकी कोणते विधान अनुचित नाही?

(अ) शासकीय कर्मचाऱ्याच्या संघटनेच्या नियमांमध्ये सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने कोणत्याही वेळी दुरुस्ती करता येते, बदल करता येतो, नियम रद्द करता येतील किंवा भर घालता येईल.

(ब) प्रस्तावित बदलांबाबत सदस्यांना 7 दिवस अगोदर सूचना देण्यात आली पाहिजे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब) (3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

46. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, 1967 अन्वये नियुक्त केलेल्या पोलीस पाटील यांचेसंदर्भात म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 नुसार पुढीलपैकी कोणते विधान चूक आहे ?

(1) त्यास देणगी स्विकारता येते

(2) त्यास वृत्तपत्रे/आकाशवाणी यांच्याशी संपर्क ठेवता येतो

(3) तो वर्गणी गोळा करू शकतो

(4) त्यास खाजगी नोकरी स्विकारता येते

---

47. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने शेअर्स, कर्जरोखे किंवा इतर गुंतवणूकी यांची वारंवार खरेदी करणे व विक्री करणे ह्या बाबी सट्टा या सदरात येतात, हे विधान चूक की बरोबर ते सांगा.

(1) वरील विधान बरोबर आहे
(2) वरील विधान अंशत: बरोबर आहे
(3) वरील विधान चूक आहे
(4) वरील विधान अंशत: चूक आहे

---

48. म.ना.से. (वर्तणुक) नियम 1979 अन्वये खालीलपैकी कोणाच्या कृतीमुळे नियमांचा भंग केला जातो ?

(अ) श्री. नंदकुमार यांच्या पत्नी विमा एजंट आहेत. तथापि त्याचेवतीने श्री. नंदकुमार सर्व व्यवहार हाताळतात.

(ब) श्रीम. विजया या मैको बँकेच्या सदस्या असून संचालक मंडळातील अध्यक्षाचे पद भूषवीत आहेत.

(क) श्री. अशोक सुटीच्या दिवशी वृद्धाश्रमातील कामकाजाचे व्यवस्थापन विनामूल्य करतात.

(ड) श्री. राजे नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणार असल्याने, 'गुंज' या सेवाभावी संस्थेतील नोकरीसंदर्भात त्यांनी वाटाघाटी केल्या आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) श्रीम. विजया
(2) श्री. नंदकुमार
(3) श्री. अशोक व श्री. राजे
(4) श्रीम. विजया व श्री. राजे

---

49. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम खालीलपैकी कोणाला लागू होणार नाहीत ?

(1) अखिल भारतीय सेवा.

(2) अखिल भारतीय सेवा (वर्तणुक) नियम 1968 लागू असणाऱ्या सेवा.

(3) फक्त (1)

(4) (1) व (2)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

50. मागासवर्गीय शासकीय कर्मचाऱ्याने सेवेसंबंधी खालीलपैकी कोणाकडे अभिवेदन केल्यास तो दबाव आणण्याचा प्रयत्न केला असे ठरणार नाही.

(अ) समाजकल्याण विभागाचे सचिव

(ब) आदिवासी कल्याण विभागाचे राज्यमंत्री

(क) समाजकल्याण विभागाचे मंत्री

(ड) विधानसभेचा विरोधी पक्ष नेता

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) (2) (ब) व (क)

(3) (अ) व (क) (4) सर्वच

---

51. शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक :

(1) शासकीय कर्मचाऱ्यास दाखविण्यात येत नाही.

(2) शासकीय कर्मचाऱ्याने विनंती केल्यास त्याला दाखविता येते.

(3) कार्यालय प्रमुखास आवश्यक वाटल्यास, शासकीय कर्मचाऱ्यास दाखविण्यात येते.

(4) शासकीय कर्मचाऱ्यास प्रतिवर्षी दाखविणे आवश्यक आहे.

---

52. कर्तव्यामध्ये खालील बाबी येतात.

(अ) परिवीक्षाधीन म्हणून केलेली सेवा

(ब) सक्तीचा प्रतिक्षा कालावधी

(क) रजा

(ड) सक्तीच्या विभागीय परीक्षेस बसण्यासाठीचा कालावधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क) व (ड) (2) (अ), (क) व (ड)

(3) (अ) व (ड) (4) (अ), (ब) व (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

53. अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक कोणाच्या अभिरक्षेत असते ?

(1) विभाग प्रमुख (2) कार्यालय प्रमुख
(3) लेखा अधिकारी (4) यापैकी कोणीही नाही

---

54. शासकीय कर्मचाऱ्यास विशेष कामाबद्दल राज्याच्या एकत्रित निधीतून देण्यात येणारी रक्कम म्हणजे :

(1) विशेष वेतन (2) फी (3) मानधन (4) वेतन

---

55. शासकीय कर्मचाऱ्यास जन्मवर्ष माहीत आहे, परंतू तारीख माहीत नाही अशा परिस्थितीत जन्मतारीख म्हणून कोणती तारीख मानण्यात येते ?

(1) 1 जुलै (2) 1 जानेवारी (3) 1 एप्रिल (4) 1 जून

---

56. राजपत्रित अधिकाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्यासंबंधीच्या प्रकरणात :

(1) विभागाने आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा.
(2) विभागाने वित्त विभागास प्रस्ताव पाठवावा.
(3) विभागाने सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव पाठवावा.
(4) विभागाने सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास प्रस्ताव पाठवावा.

---

57. बदलीनंतर पदाचा कार्यभार सुपूर्द करण्यासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान खरे आहे ?

(1) पदाचा कार्यभार मुख्यालयाच्या ठिकाणीच सोपविता येत नाही.
(2) कार्यभार सुपूर्द करताना सार्वजनिक सुटी नसावी.
(3) सार्वजनिक सुटी असली तरी पदाचा कार्यभार स्वीकारण्याच्या प्रक्रियेत रोख रक्कम आणि रोखे सुपूर्द करण्याचा आणि स्वीकारण्याचा समावेश नसेल तर त्या दिवशी कार्यभार स्वीकारता येतो.
(4) वरील सर्व पर्याय बरोबर आहेत.

---

58. खालीलपैकी बरोबर विधान कोणते ?

(1) वैद्यकीय तपासणीमध्ये अपात्र ठरल्यास अशा सर्व प्रकरणी तात्काळ सेवा समाप्त केली जाते.
(2) वैद्यकीय तपासणीमध्ये अपात्र ठरल्याचे निष्कर्ष कळविण्यापासून सहा महिन्यांत अपील करता येते.
(3) पर्याय 2 मधील अपील फेटाळल्यास संचालक, आरोग्यसेवा यांच्याकडे पुनरिक्षण करण्यासाठी अर्ज करता येतो.
(4) वरील सर्व विधाने असत्य आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

59. वैद्यकीय तपासणी/पात्रता प्रमाणपत्राबाबत खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे?

(1) वैद्यकीय पात्रता प्रमाणपत्र सेवाविषयक इतर कागदपत्रांबरोबरच सुरक्षित ठेवले पाहिजे.

(2) दृष्टीचाचणीच्या कारणाखेरीज अन्य कारणास्तव अपात्र ठरलेल्या उमेदवारांना दुसऱ्या वैद्यकीय तपासणीसाठी अपील करता येते.

(3) महिलांच्या बाबतीत वैद्यकीय प्रमाणपत्र गोपनीय ठेवतात.

(4) केवळ अविवाहित महिलांच्या बाबतीत वैद्यकीय प्रमाणपत्र गोपनीय ठेवतात.

---

60. खालील बाबी वाचून योग्य पर्याय निवडा.

(अ) अंशकालिक कर्मचाऱ्यास देखील वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करण्यास सांगण्यात आले.

(ब) शासकीय सेवेत नियुक्तीसाठी अपात्र असल्याचे प्रमाणपत्र मिळताच कर्मचाऱ्यास तात्काळ सेवेतून काढून टाकले.

(क) खेळाडूंसाठी राखीव जागेवर शरीर सौष्ठवपटुची नियुक्ती करताना वैद्यकीय तपासणी अनावश्यक असल्याचे नियुक्ती प्राधिकाऱ्याने अभिप्राय दिले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) योग्य नाहीत.
(2) फक्त (अ) योग्य नाही.
(3) फक्त (ब) योग्य नाही.
(4) फक्त (ब) आणि (क) योग्य नाहीत.

---

61. खालीलपैकी कोणती सेवा स्वीयेतर सेवेमध्ये येते?

(1) मंत्री आस्थापनेवरील सेवा

(2) मंत्रालयीन संवर्गातील कर्मचाऱ्यांनी क्षेत्रीय कार्यालयात केलेली सेवा

(3) क्षेत्रीय आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांनी मंत्रालयीन विभागात केलेली सेवा

(4) राज्य शासनाचा सार्वजनिक उपक्रम असलेल्या एस.टी. महामंडळातील सेवा

---

62. कर्तव्यामध्ये पुढील बाब समाविष्ट होत नाही.

(1) पदग्रहण अवधी

(2) विशिष्ट प्रकरणात पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत जेवढ्या कालावधीपर्यंत सक्तीने आदेशाची वाट पहावी लागते तो कालावधी

(3) लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेच्या ठिकाणी जाण्याचा व तेथून येण्याचा रास्त वेळ जमेस धरून त्या परीक्षेस बसण्यासाठी लागणारा कालावधी

(4) भारतीय नौसेना राखीव दलामधील प्रशिक्षणाचा कालावधी

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

63. धारणाधिकाराबाबत खालीलपैकी कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) एखाद्या पदाचा धारणाधिकार एकदा संपादित केल्यावर कोणत्याही परिस्थितीत समाप्त होत नाही.

(2) स्थायी पदावर कायम नियुक्त झाल्यास त्या पदाचा धारणाधिकार संपादित होतो.

(3) अपवादात्मक परिस्थितीत अस्थायी पदावर धारणाधिकार संपादित करता येतो.

(4) पद स्थायी असले तरी अपवादात्मक परिस्थितीत स्थानापन्न नियुक्तीनेही धारणाधिकार संपादित करता येतो.

---

64. बदली झालेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकासंदर्भात खालीलपैकी योग्य विधान निवडा.

(1) बदली झालेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्याच्या अंतिम वेतन प्रमाणपत्रासह सेवापुस्तक त्याच्याकडे सोपवावे.

(2) बदलीने रूजू करून घेणाऱ्या कार्यालयाने नवे सेवापुस्तक तयार करावे.

(3) सेवापुस्तक बदली झालेल्या अराजपत्रित शासकीय कर्मचाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येऊ नये.

(4) कार्यालयप्रमुखाने लेखी आदेश दिल्यास सेवापुस्तक बदली झालेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्याच्या स्वाधीन करता येते.

---

65. सेवेच्या सर्वसाधारण शर्तींच्या प्रयोजनार्थ 'उच्च सेवा' या संज्ञेचा अर्थ खालीलप्रमाणे होतो :

(1) केवळ भारतीय प्रशासनिक सेवा

(2) केवळ राजपत्रित पदावरील सेवा

(3) वर्ग चारची सेवा नसेल अशी कोणत्याही प्रकारची सेवा

(4) वर्ग एकपेक्षा कमी दर्जाची नसेल अशी कोणतीही सेवा

---

66. वाढीव कर्तव्ये व जबाबदाऱ्या असलेल्या पदावर नियुक्ती झाल्यास, शासकीय कर्मचाऱ्यास त्या पदाचे वेतन :

(1) त्या पदावरील नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून अनुज्ञेय होते.

(2) ते पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय होते.

(3) त्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय होते.

(4) पुढील महिन्याच्या एक तारखेपासून अनुज्ञेय होते.

---

67. विशेष वेतन म्हणजे :

(1) विशेष स्वरूपाचे काम केल्याबद्दल देण्यात येणारे वेतन.

(2) कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीत विशिष्ट वाढ झाल्याने देण्यात येणारे वेतन.

(3) विशेष स्वरूपाच्या पदांवर नियुक्तीनंतर देण्यात येणारे वेतन.

(4) विशिष्ट क्षेत्रात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे वेतन.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

68. शासकीय कर्मचाऱ्याने एखादे पद धारण केले असते तर त्याला जे मिळाले असते ते म्हणजे :

(1) वैयक्तिक वेतन (2) वित्तलब्धी (3) संभाव्य वेतन (4) विशेष वेतन

---

69. खालीलपैकी कोणत्या पर्यायामधील विधान योग्य आहे ?

(1) वैद्यकीय तपासणीत आढळलेली विकलांगता माफ करता येत नाही.

(2) नियुक्ती प्राधिकारी नेत्रदोषाव्यतिरिक्त कोणतीही विकलांगता माफ करू शकत नाही.

(3) संचालक, आरोग्यसेवा नेत्रदोषाची विकलांगता वगळून अन्य विकलांगता माफ करू शकतात.

(4) वरील सर्व विधाने चूक आहेत.

---

70. शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात खालील बाबींची नोंद घेण्यात येते.

(अ) नियुक्ती (ब) पदावनती (क) बदली (ड) जन्मतारीख

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (ड) (2) (अ), (क) व (ड)

(3) (अ), (ब), (क) व (ड) (4) (अ) व (ड)

---

71. वेतनामध्ये खालीलपैकी कोणत्या बाबीचा/बाबींचा समावेश होतो ?

(अ) धारण केलेल्या पदाकरीता मंजूर केलेले वेतन,

(ब) वैयक्तिक वेतन व विशेष वेतन

(क) महागायीशी मुकाबला करण्यासाठी दिलेली दरमहा रक्कम,

(ड) अन्य कोणतीही वित्तलब्धी, जिचा वेतनचिठ्ठीमध्ये समावेश केला जातो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब), (क), (ड) बरोबर आहेत.

(2) फक्त (अ), (ब) आणि (क) बरोबर आहेत.

(3) फक्त (अ), (ब) आणि (ड) बरोबर आहेत.

(4) फक्त (अ) आणि (ब) बरोबर आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**72.** शासकीय कर्मचाऱ्यास खालील निधीमध्ये वर्गणी जमा करणे आवश्यक आहे.

(1) सार्वजनिक भविष्य निधी (2) स्थानिक निधी

(3) सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी (4) बँकेतील ठेव निधी

---

**73.** वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यासंदर्भात खालील विधान नियमानुसार योग्य आहे.

(1) कार्यालय प्रमुखाने दरवर्षीचे गोपनीय अहवाल पाहून वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात करावी.

(2) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद असल्याशिवाय सेवापुस्तक परिपूर्ण मानले जात नाही.

(3) विभाग प्रमुखांनी तसे आदेश दिले असतील तरच वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात केली जाते.

(4) वैयक्तिक चारित्र्य प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात कधीही केली जात नाही.

---

**74.** खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत कमी वेतन असलेल्या पदावर बदली अनुज्ञेय असते ?

(1) कर्मचाऱ्याने लेखी विनंती केली असल्यास.

(2) कमी कष्टाचेच काम करण्यास तो योग्य असल्याचे सलग 3 वर्षांच्या गोपनीय अहवालात नोंदविले असल्यास.

(3) धारण केलेल्या पदासाठी विहित केलेली अर्हता त्याच्याकडे नसल्याचे आढळल्यास.

(4) वर नमूद सर्व पर्यायांतील परिस्थितीत कमी वेतन असलेल्या पदावर बदली अनुज्ञेय असते.

---

**75.** निश्चित वेतन दरावरील मर्यादीत कालावधीसाठी मंजूर करण्यात येणारे पद म्हणजे :

(1) स्थायी पद (2) निश्चित वेतन पद (3) कंत्राटी पद (4) अस्थायी पद

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - ब

76. शासन कार्य नियमावलीनुसार खालीलपैकी **अयोग्य** वाक्य/वाक्ये निवडा :

(अ) मंत्रालयाच्या प्रत्येक विभागासाठी शासनाचा सचिव नेमला जाईल.

(ब) मंत्रालयाच्या एका विभागासाठी एकच शासनाचा सचिव नेमला जाईल.

(क) मंत्रालयाच्या दोन विभागांसाठी एक शासनाचा सचिव नेमला जाईल.

(ड) मंत्रालयाच्या एका विभागासाठी दोन शासनाचे सचिव नेमले जातील.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी (अ) आणि (ब)
(2) वरीलपैकी (ब) आणि (क)
(3) वरीलपैकी फक्त (ब)
(4) वरीलपैकी फक्त (ड)

---

77. आवकपत्रावरील कार्यवाहीचे प्राथम्यक्रम ठरविण्याचे काम कोणी करावे ?

(1) आवक लिपिक
(2) सर्वसाधारण कार्यलिपिक
(3) सहायक
(4) कार्यासन अधिकारी

---

78. शासन कार्य नियमावलीनुसार खालीलपैकी कोणते प्रस्ताव मंत्रिपरिषदेच्या मान्यतेसाठी सादर केले जातात ?

(अ) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाच्या नियुक्तीसाठी असलेले प्रस्ताव.

(ब) राज्याच्या महाअधिवक्त्याच्या नियुक्तीसाठी असलेले प्रस्ताव.

(क) उच्च न्यायालयाच्या सरकारी वकीलाच्या नियुक्तीसाठी असलेले प्रस्ताव.

(ड) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशींशी विसंगत असलेल्या नेमणूकीसाठी प्रस्ताव.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ब)
(2) (अ), (ब) आणि (क)
(3) (ब) आणि (ड)
(4) वरीलपैकी सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

79. एखाद्या सरकारी अधिकाऱ्यास निकडीच्या स्वरूपाची एखादी महत्त्वाची बाब, दुसऱ्या सरकारी अधिकाऱ्याच्या व्यक्तिगत निदर्शनास आणून द्यावयाची असते तेव्हा पुढीलपैकी कोणत्या नमुन्याचा वापर केला जातो ?

(1) ज्ञापन (2) परिपत्रक (3) अर्धशासकीय पत्र (4) कार्यालयीन आदेश

---

80. खालीलपैकी कोणत्या प्रकरणांना 'तातडीचे' किंवा 'तात्काळ' अशा खूणचिठ्ठ्या लावण्याची आवश्यकता आहे ?

(अ) टंचाई प्राथम्य असलेली प्रकरणे

(ब) विधानसभा प्रश्न

(क) विधानपरिषद प्रश्न

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) (ब) व (क)

(3) (अ), (ब) व (क) (4) यापैकी कोणतेही नाही

---

81. कपात सूचना मांडण्याचा अधिकार कोणाला असतो ?

(1) विधानसभा सदस्य (2) विधानपरिषद सदस्य

(3) दोघांनाही (4) यापैकी नाही

---

82. कार्यालयीन कार्यपद्धती नियम पुस्तिकेनुसार शासकीय पत्रव्यवहाराच्या नमुन्यांपैकी खालीलपैकी योग्य नमूना असलेला पर्याय निवडा :

(1) शासनाचे जनतेवर परिणाम करणारे निर्णय जनतेला कळवायचे असतात, त्यावेळी शासन निर्णय निर्गमित केला जातो.

(2) शासनाचे महत्वाचे निर्णय कळवायचे असतात, त्यावेळी परिपत्रक निर्गमित केले जाते.

(3) शासनाचे लोकांवर परिणाम करणारे निर्णय जनतेला कळवायचे असतात, त्यावेळी अधिसूचना निर्गमित केली जाते.

(4) शासनाचा निर्णय सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कळवायचा असतो, त्यावेळी ज्ञापन निर्गमित केले जाते.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

83. कार्यासनाचे निरिक्षण करण्याचा उद्देश कोणता असतो ?

(अ) विहीत केलेली कार्यपद्धती प्रत्यक्षात पाळण्यात येत आहे किंवा नाही याची पडताळणी करणे.

(ब) कार्यासनाला त्याच्या क्षमतेचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शन करणे.

(क) हाताखालील कर्मचाऱ्यांना धाकात ठेऊन त्यांचेकडून काम करवून घेणे.

(ड) कामकाजातील दोष दूर करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) व (क) (2) (अ), (ब) व (ड)

(3) फक्त (अ) व (ड) (4) वरील सर्व

---

84. कार्यालयीन कार्यपद्धती नियम पुस्तिकेनुसार मंत्रालयीन विभागांमध्ये पुढील प्रकारची प्राथम्यक्रम चिन्हे वापरली जातात :

(अ) अतितात्काळ (ब) तात्काळ

(क) तातडीचे (ड) निकडीचे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ), (ब) आणि (क) (2) (ब), (क) आणि (ड)

(3) (अ), (क) आणि (ड) (4) वरील सर्व

---

85. अभिलेखांच्या वर्गीकरणासंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत :

(अ) 'अ' आणि 'ब' वर्गात वर्गीकरण केलेल्या फाईल्स ज्या वर्षी बंद करण्यात येतात त्याच वर्षी तात्काळ मंत्रालय अभिलेख कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.

(ब) 'अ' व 'ब' वर्गात वर्गीकरण केलेल्या फाईल्सचे कोणत्याही परिस्थितीत वर्गीकरण बदलता येत नाही.

(क) 'क' वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या फाईल्स 5 वर्षाची मुदत संपल्यानंतर मंत्रालय अभिलेख कार्यालयाकडून नष्ट करण्यात येतात.

(ड) 'ड' वर्गामध्ये वर्गीकरण केलेल्या फाईल्स व कागदपत्रे एक वर्षाची मुदत संपल्यानंतर त्या कार्यासनामार्फतच नष्ट करण्यात येतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) योग्य (2) (अ) व (ड) योग्य

(3) (अ) व (क) योग्य (4) फक्त (ड) योग्य

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

86. मंत्रालयातील टिप्पणी लेखन व पत्रव्यवहार नियमावलीनुसार ज्यावेळी टिप्पणीची आवश्यकता नसते, अशा पुढीलपैकी कोणत्या बाबी आहेत ?

(अ) वस्तुस्थितीवर आधारित उत्तरे पाठविणे.

(ब) शासकीय कार्यालयांकडून अतिरिक्त माहिती मागविणे.

(क) निरंक माहिती पाठवणे.

(ड) फक्त अर्जाची किंवा पत्राची पोच द्यावयाची असल्यास.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ), (ब) आणि (ड) (2) फक्त (अ) आणि (ड)

(3) फक्त (ब) आणि (ड) (4) वरील सर्व

---

87. 'महाराष्ट्र शासकीय गट 'अ' व गट 'ब' (राजपत्रीत व अराजपत्रीत) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, 2015' मधील तरतुदीनुसार गट 'अ' व गट 'ब' मधील पदावर नियुक्ती करताना महसूली विभागाचे वाटप कोणत्या क्रमाने करणे आवश्यक आहे ?

(1) पुणे, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, नाशिक

(2) कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

(3) नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, पुणे, कोकण

(4) नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, कोकण, पुणे

---

88. टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात जिल्हास्तरीय समन्वय समितीमध्ये पुढीलपैकी कोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश नसतो ?

(अ) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा).

(ब) उप जिल्हाधिकारी (रोहयो).

(क) उप अभियंता जलसंपदा.

(ड) उप विभागीय कृषी अधिकारी.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) आणि (ड) (2) (ब) आणि (क)

(3) (ब) आणि (ड) (4) (क) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

89. मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी यांच्यात सुसंवाद निर्माण होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत नुकतेच पुढील नियतकालिक सुरू करण्यात आले आहे?

(1) आपलं सरकार (2) आपलं मंत्रालय (3) आपलं सचिवालय (4) यापैकी नाही

---

90. महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या 'जलयुक्त शिवार' अभियानासंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत?

(अ) ही एक जलसंधारणाची योजना असून सन 2019 पर्यंत महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

(ब) या योजनेअंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या घराच्या शिवारात पावसाचे पाणी साठवून त्याचा पिण्यासाठी वापर करावा यासाठी त्यास उद्युक्त केले जाते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) दोन्ही (अ) व (ब) बरोबर (4) दोन्ही (अ) व (ब) चूक

---

91. खालीलपैकी कोणत्या बाबीवर प्रश्न विचारता येणार नाही?

(अ) न्यायालयाच्या अभिनिर्णयार्थ असलेली बाब.

(ब) विधानमंडळाने नेमलेल्या समितीच्या कामकाजासंदर्भात.

(क) काल्पनिक सिद्धांताची उकल करण्याची मागणी.

(ड) मंत्रालयीन विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) एकही नाही

(3) केवळ (अ), (ब), (क) (4) केवळ (ड)

---

92. पुढीलपैकी कोणत्या बाबींवर विधानमंडळ सदस्याने उपस्थित केलेला प्रश्न स्वीकार्य होऊ शकतो.

(अ) एखाद्या सार्वजनिक बाबीसंबंधी शासनाच्या हेतूविषयी स्पष्टीकरण मागणारा प्रश्न.

(ब) न्यायालयाच्या अभिनिर्णयार्थ असलेल्या बाबीसंबंधी प्रश्न.

(क) विधानमंडळाने नेमलेल्या कोणत्याही समितीतील कामकाजाविषयी माहिती विचारणारा प्रश्न.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (अ) व (क)

(3) फक्त (ब) व (क) (4) यापैकी कोणताही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

93. अंदाज समिती स्थापनेचा मुख्य उद्देश पुढीलप्रमाणे आहे :

(अ) अर्थसंकल्प ज्या नमुन्यामध्ये सादर करावयाचा आहे तो नमुना सुचविणे.

(ब) अर्थसंकल्पिय अंदाज व पूरक अनुदानासाठीचे प्रस्ताव मंजूर करणे.

(क) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या राज्याच्या विनियोजन लेख्यांसंबंधातील अहवालाच्या बाबींचे काम करणे.

(ड) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या अर्थसंकल्पाविषयी कामकाजाचे नियंत्रण करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरीलपैकी सर्व (2) यापैकी नाही

(3) फक्त (अ) (4) फक्त (ब)

---

94. अल्पसूचना प्रश्नाच्या बाबतीत पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(अ) अशी सूचना अधिवेशनाच्या प्रारंभापूर्वी सात दिवसापेक्षा जास्त अगोदर देता येत नाही.

(ब) बृहन्मुंबईच्या हद्दीतील माहितीसंबंधी प्रश्न असल्यास शासनाने प्रश्न मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत उत्तर देणे अपेक्षित असणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ) (2) फक्त (ब)

(3) दोन्ही विधाने योग्य आहेत (4) दोन्ही विधाने अयोग्य आहेत

---

95. विधानसभा अतारांकित प्रश्नांची उत्तरे तीन महिन्यांऐवजी 30 दिवसांत शासनाने पाठवावीत असा निर्णय खालीलपैकी कोणत्या समितीने घेतला ?

(1) नियम समिती (2) उपविधान समिती

(3) स्थायी समिती (4) कामकाज सल्लागार समिती

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

96. मंत्रीपरिषदेतील मुख्यमंत्री तसेच एकूण मंत्री यांची संख्या विधानसभेच्या एकूण संख्येच्या पंधरा संख्यापेक्षा अधिक असणार नाही तथापि एकूण संख्या कितीपेक्षा कमी असणार नाही ?

(1) बारा (2) पंधरा (3) आठ (4) दहा

---

97. अनुच्छेद 156 (3) नुसार खालीलपैकी कोणाचा पदावधी संपला असला तरीही त्याचा उत्तराधिकारी स्वतःचे पदग्रहण करीपर्यंत पद धारण करणे चालु ठेवील ?

(1) अध्यक्ष, जिल्हा परिषद (2) मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालय

(3) राज्यपाल (4) सरपंच ग्रामपंचायत

---

98. राज्यपालांच्या संदर्भात खालील विधाने अभ्यासा :

(अ) राज्यपाल संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा अथवा राज्याच्या विधानमंडळाचा सदस्य असणार नाही.

(ब) राज्यपाल अन्य कोणतेही लाभपद धारण करणार नाही.

(क) राज्यपालास अधिकृत निवासस्थानाच्या वापरापोटी राष्ट्रपती निर्धारित करतील अशी रक्कम राज्य सरकारला द्यावी लागेल.

(ड) राज्यपालाच्या वित्तलब्धी व भत्ते कमी करण्याचा अधिकार राज्याच्या विधानमंडळास असेल.

उपरोक्त विधानांपैकी **योग्य** विधाने कोणती आहेत ?

(1) (अ), (ब), (क) व (ड) (2) (अ) व (ब)

(3) (अ), (ब) व (क) (4) (अ), (ब) व (ड)

---

99. विधानपरीषद असलेल्या राज्याच्या विधानसभेने धन विधेयक पारीत केल्यानंतर, ते विधानपरीषदेकडे तिच्या शिफारशींकरीता पाठविले जाईल आणि ते विधेयक मिळाल्याच्या दिनांकापासून 14 दिवसाच्या कालावधीच्या आत, विधानपरीषद आपल्या शिफारशींसह ते विधेयक विधानसभेकडे परत पाठविल आणि तदनंतर विधानसभेला विधानपरीषदेच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही शिफारशी एकतर स्वीकारता येतील किंवा फेटाळता येतील या बाबतची तरतुद कोणत्या कलमान्वये केलेला आहे ?

(1) कलम 197 (1) (2) कलम 198 (1) (3) कलम 197 (2) (4) कलम 198 (2)

---

100. विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य व राज्यपाल या पदावरील नियुक्तीसाठी किमान वयोमर्यादा (वर्ष) अनुक्रमे खालीलप्रमाणे आहे :

(1) 25, 30, 35 (2) 30, 35, 25 (3) 35, 25, 30 (4) 30, 25, 35

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - क

76. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये राज्याच्या सेवांमध्ये नियुक्ती करण्याकरीता परीक्षा घेण्याबाबतची तरतुद विहित केली आहे ?

(1) अनुच्छेद 319 (2) अनुच्छेद 320 (1) (3) अनुच्छेद 321 (4) अनुच्छेद 322

---

77. संविधानातील खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदाखालील तरतुदीनुसार आरक्षणसंदर्भात लोकसेवा आयोगाची सल्लामसलत करण्याची शासनास आवश्यकता नाही ?

(1) अनुच्छेद 320 (1) (2) अनुच्छेद 320 (4) (3) अनुच्छेद 321 (4) अनुच्छेद 319

---

78. भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार संयुक्त लोकसेवा आयोग नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे ?

(1) अनुच्छेद 320 (2) अनुच्छेद 318 (3) अनुच्छेद 315 (4) अनुच्छेद 323

---

79. लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्य यांना दुर्वतनाच्या कारणास्तव पदावरुन दुर करण्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने अनुसरावयाची कार्यपद्धती भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदानुसार विहित करण्यात आली आहे ?

(1) 318 (2) 320 (3) 142 (4) 145

---

80. लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची संख्या, सेवाशर्ती तसेच कर्मचारी संख्या व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती संविधानातील खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदांनुसार विहित करण्यात येतात ?

(1) अनुच्छेद 309 (2) अनुच्छेद 320 (3) अनुच्छेद 319 (4) अनुच्छेद 318

---

81. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 320 चा खंड (3) च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या शक्तिंचा वापर करुन खालीलपैकी कोणते विनियम केले आहेत ?

(1) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (विचार विनिमयापासून सूट) विनियम, 1965

(2) महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, 1971

(3) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्यनियमावली

(4) वरीलपैकी एकही नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

82. आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षांचा खर्च खालीलपैकी कोणत्या शिर्षांतर्गत करण्यात येतो ?

(1) भारित खर्च (2) दत्तमत खर्च

(3) भारित खर्च व दत्तमत खर्च (4) यापैकी नाही

83. राज्यसेवा परीक्षेद्वारे मुलाखातीस पात्र ठरलेल्या उमेदवारास अंतिम निवडीसाठी विचारक्षेत्रात येण्यासाठी मुलाखातीस किमान किती गुण मिळविणे आवश्यक आहे ?

(1) 35 टक्के (2) 40 टक्के

(3) 41 टक्के (4) वरीलपैकी एकही नाही

84. राज्यसेवा परीक्षेमार्फत सध्या शासनाच्या विविध विभागातील एकूण किती संवर्गाची पदे भरण्यात येतात ?

(1) 19 (2) 21 (3) 25 (4) 20

85. आयोगाच्या कार्यालयातील परीक्षेसाठी लागणाऱ्या सामग्रीची निविदेद्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विभागीय खरेदी समितीचे अध्यक्ष कोण आहेत ?

(1) आयोगाचे सचिव (2) आयोगाचे अध्यक्ष

(3) लेखाधिकारी म.लो.आ. (4) सहसचिव (आस्थापना) म.लो.आ.

86. आयोगाच्या सदस्यांची रजा मंजूर करण्याचे अधिकार खालीलपैकी कोणास आहेत ?

(1) मा. राज्यपाल (2) आयोगाचे अध्यक्ष

(3) आयोगाचे सचिव (4) आयोगाचे सर्व सदस्य

87. खालीलपैकी कोणत्या कार्यालयीन आदेशान्वये "जोपर्यन्त वरिष्ठ अधिकारी कार्यालय सोडत नाहीत, तोपर्यन्त कार्यासनातील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी कार्यालय सोडू नये" असे आदेश जारी केले आहेत ?

(1) दिनांक 11 ऑगस्ट, 2008 (2) दिनांक 11 ऑगस्ट, 2009

(3) दिनांक 11 ऑगस्ट, 2010 (4) दिनांक 11 ऑगस्ट, 2011

88. आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांना कर्तव्ये पार पाडत असताना केलेल्या प्रवासाबद्दल महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्याच्या दर्जानुसार देय आहे ?

(1) मुख्य सचिव (2) शासनाचे सचिव

(3) शासनाचे प्रधान सचिव (4) मुख्य विभाग प्रमुख

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

89. संघ लोकसेवा आयोगाकडून काळ्या यादीत समाविष्ट केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून खालीलपैकी कोणती कार्यवाही करण्यात येते ?

(1) कायमस्वरूपी प्रतिरोधित करण्यात येते.

(2) संघ लोकसेवा आयोगाकडून प्रतिरोधित केलेल्या कालावधी पुरतेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रतिरोधित करण्यात येते.

(3) कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.

(4) शासनास कळवीले जाते.

---

90. आयोगाचे स्थायी आदेश क्र. 11/2010, दिनांक 15 ऑक्टोबर 2010 नुसार :

(अ) चोपदार, नाईक व शिपाई कर्मचारी यांची कार्यालयीन वेळ – सकाळी 9 : 00 ते सायंकाळी 5 : 30 वाजेपर्यंत.

(ब) हमाल व स्वच्छक कर्मचारी कार्यालयीन वेळ सकाळी 8 : 00 ते सायंकाळी 4 : 00 वाजेपर्यंत विहित करण्यात आला आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (अ) व (ब) बरोबर (2) फक्त (अ) बरोबर

(3) फक्त (ब) बरोबर (4) (अ) व (ब) दोन्ही चूक

---

91. नॉन क्रीमी लेअर मध्ये मोडणाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवाराने शिफारसीसाठी विचार क्षेत्रात येण्यासाठी मुख्य परीक्षेत खालील प्रमाणे किमान गुण प्राप्त करणे आवश्यक आहे ?

(1) 35 टक्के गुण (2) 35 पर्सेंटाईल गुण

(3) 30 टक्के गुण (4) 30 पर्सेंटाईल गुण

---

92. आयोगाच्या कार्यनियमानुसार आयोगाची बैठक आयोजित करण्याचा कालावधी खालीलपैकी कोणता आहे ?

(1) प्रत्येक महिन्यात (2) दोन महिन्यात एकदा

(3) तीन महिन्यात एकदा (4) प्रत्येक पंधरवड्यास

---

93. खालीलपैकी कोणत्या शासन आदेशाद्वारे मा. राज्यपाल यांचे कार्यालय व मंत्रालय विभाग यांच्याव्यतिरिक्त इतरांना आयोगाशी थेट पत्रव्यवहार करण्यास मनाई करण्यात आली आहे ?

(1) शासन परिपत्रक दिनांक 25 सप्टेंबर, 1970

(2) शासन परिपत्रक दिनांक 30 डिसेंबर, 1993

(3) शासन परिपत्रक दिनांक 15 जून, 1995

(4) शासन परिपत्रक दिनांक 19 ऑगस्ट, 1981

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

94. आयोगाशी पत्रव्यवहार करताना तो किमान उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या स्तरावरुन अग्रेषण पत्राद्वारे करण्यात करण्याबाबतच्या सूचना प्रशासकीय विभागांना खालीलपैकी कोणत्या दिनांकाच्या शासन परिपत्रकानुसार करण्यात आलेल्या आहेत ?

(1) दिनांक 17 ऑगस्ट, 2014
(2) दिनांक 17 ऑगस्ट, 2015
(3) दिनांक 3 डिसेंबर, 2013
(4) दिनांक 3 डिसेंबर, 2014

95. स्पर्धा परीक्षेद्वारे मुलाखातीस अर्हताप्राप्त ठरण्यासाठी खेळाडू उमेदवारांना मुख्य परीक्षेत किमान किती शतमत (percentile) गुणांची आवश्यकता आहे ?

(1) किमान 40 शतमत
(2) किमान 35 शतमत
(3) किमान 30 शतमत
(4) किमान 20 शतमत

96. राज्य सेवा परीक्षेत समाविष्ट असलेल्या कोणत्या पदासाठी भौतिकशास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान अथवा अभियांत्रिकी शाखेतील पदवी उमेदवाराने धारण केलेली असणे आवश्यक आहे ?

(1) उपजिल्हाधिकारी, गट-अ
(2) उपनिबंधक सहकारी संस्था, गट-अ
(3) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-अ
(4) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ

97. आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन वयोमर्यादेची गणना खालीलपैकी कोणत्या नियमानुसार करण्यात येते ?

(1) मुंबई नागरी सेवा नियम, 1939
(2) महाराष्ट्र नागरी सेवा (नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी उच्च वयोमर्यादेची तरतूद) नियम, 1986
(3) स्थायी आदेश
(4) आयोगाची कार्यनियमावली

98. आयोगाचा कार्यालयाच्या वार्षिक अहवालास खालीलपैकी कोणाच्या मान्यतेची आवश्यकता आहे ?

(1) सचिव
(2) अध्यक्ष
(3) सांख्यिकी अधिकारी
(4) संपूर्ण आयोग

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

99. सरळ सेवा विभागामार्फत 'एका' पदासाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीच्या अनुपत्राने मुलाखातीस आमंत्रित करावयाच्या उमेदवारांची संख्या खालीलपैकी कोणती आहे ?

(1) 3 (2) 4 (3) 5 (4) 6

---

100. दिनांक 1 ऑक्टोबर, 2016 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन उपजिल्हाधिकारी, गट-अ पदाकरीता वयोमर्यादा गणण्याचा दिनांक खालीलपैकी कोणता असेल ?

(1) दिनांक 1 फेब्रुवारी, 2017
(2) दिनांक 1 एप्रिल, 2017
(3) दिनांक 1 मार्च, 2017
(4) दिनांक 1 जानेवारी, 2016

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial